अग्निशमन व विद्युत विशेष समितीची सोमवार दिनांक 05.02.2018 रोजी दुपारी 3.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल

सभेत मा. सभापती श्री ॲड. संजयकुमार बालपांडे यांचेसह उपसभापती श्री प्रमोद चिखले, मा. सदस्य श्री विरेन्द्र कुकरेजा मा. सदस्य श्री राजकुमार शाहु, मा. सदस्य श्री लहुकुमार बेहते मा. सदस्या श्रीमती ममता सहारे मा. सदस्य हरीष ग्वालबशी श्रीमती वनिता दांडेकर विभागातर्फे मा. अति आयुक्त श्री मोहिते कार्यकारी अभियंता प्रकल्प , कार्यकारी अभियंता विद्युत अग्निशमन अधिकारी तथा विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली. विषय पत्रिकेतील विषय क्रमाक 1 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्कात वाढ करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करणे या विषयावर विभागासह साधक बाधक चर्चा करण्यात आली या वेळी सदस्य श्री हरीष ग्वालबंशी यांनी नियमाप्रमाणे कोणतेही शुल्कात वृध्दि करते वेळी त्यांचे शूल्क वृध्दि चार्ट सदस्यांना द्यावयास हवे तथा त्या बाबत विस्तृत माहिती समजावून सांगावयास हवी होती विभागाने तसे केले नसल्यामुळे ह्या विषयावर विचार करता आला नाही यावेळी विभागाने दरवृध्दि संबंधात माहिती प्रस्तुत केली. 2015--16 च्या वार्षीक उत्पन्नात तथा वर्तमान वार्षीक उत्पन्नात तफावत असल्याचे निदर्शनात आणुन देण्यात आले त्याबाबत विभागाने स्पष्टीकरण प्रस्तुत केले विषयास बहुमताने मंजूरी प्रदान करण्यात आली.

विषय क्रमाक 2 नुसार त्रिमुर्तीनगर स्थानकाच्या सुरु असलेल्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेणे तसेच लकडगंज व वाठोडा अग्निशमन स्थानक यांच्या प्राकलनाबाबत चर्चा करणे या विषयावर साधक बाधक चर्चा करण्यात आली प्रकल्प अधिकारी यांनी या विषयावर माहिती दिली की 2 महिन्याच्या आत प्रकल्प पुर्णत्वास जाईल. वाढोडा येथील प्रकल्पाचे डिझाईज तयार झाले असुन टेंडर काढण्याच्या अवस्थेत आहे. क प्रत करीता पैसे भरण्यात आले आहे. याबाबत नकाशा दाखविण्यात आला. येथे कर्मचा–याच्या राहण्याच्या क्वॉटर अधिक प्रमाणात काढावयास हवे होते असे मत प्रकट करण्यात आले. तसेच यानंतर कोणत्याही प्रकल्पात कर्मचा--याचे क्वार्टरची संख्या जास्त प्रमाणात ठेवण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. या वेळी प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाच्या जागेत एम.एस.ई.डी ची डिपी हटविण्याकरीता 8 लक्ष रुपयाची मागणी केली असल्याची माहिती दिली यावर चर्चे अंती डिपी हटविण्याकरीता मागणीच्या रकमेचा भरणा नियमानुसार करण्यास समितीने मंजूरी प्रदान केली.

विषय क्रमांक 3 नुसार सोलर वॉटर हिटर व इतर योजनाबाबत चर्चा करणे या विषयावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली 3450 सोलर वॉटर हिटर देण्याची स्कीम होती यात 50 परसेंट सबसीडी देण्यात आली होती केंद्र शासनाची स्कीम होती ती संपल्यानंतर नंतर महानगरपालिकेने सबसीडी देण्याचे मान्य केले. ती स्कीम चालु आहे.

मा. सदस्य श्री शाहू यांनी अग्निशमन विभागात रिटायर्ड कर्मचारी यांना ठेवण्यात आले होते त्यांचा सेवाकाळ समाप्त झाल्यानंतर ते कार्यरत आहे या बाबत आवश्यक मंजूरी घेण्यापुर्वी बाब समितीच्या निदर्शनात आणून द्यावयास हवी होती परस्पर मंजूरी घेण्यात येवू नये असे मत प्रकट केल्यावरुन सभापती तसेच मा.सदस्य शाहु यांनी यानंतर समितीच्या समक्ष प्रस्तुत केल्याशीवाय मंजूरीस्तव पाठविण्यात येवू नये असे निर्देश दिले.

जगनाडे चौक सेवन स्टार हॉस्पीटलला फायरची मंजूरी कशी देण्यात आली?फायर व्यवस्थेकरीता आवश्यक स्पेस तेथे सोडण्यात आलेले नसल्याचे दिसुन येते बांधकाम नियमबाह्य असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते अशा आरोप करीता समिती व्दारे मौका निरीक्षण करण्याच्या आवश्यकेतवर भर दिला. त्यावर सभापती यांनी गुरुवार 8 तारखेला सकाळी 11 वाजता समिती सदस्य ,उपायुक्त, अग्निशमन अधिका–यासह निरीक्षण करण्यात येईल याची विभागाने व्यवस्था करावी असे निर्देशित करण्यात आले.

यापुर्वीच्या सभेत ईमारती संबंधात विभागाला माहिती मागीतली होती ती अप्राप्त आहे याकरीता यापुर्वी मागीतलेली सर्व माहिती मा. सदस्यांना पुरविण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

यानंतर सभेच्या समापनाची घोषण करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
अग्निशमन व विद्युत विशेष समिती